SNBP International & Senior Secondary School, Chikhali, Pune.
Affiliation No. 1130703
Academic session 2024-25
NOTES-7(TERM-II)
Subject - Marathi

std.8th

Prepared by: Renuka Joshi LESSON- ७. कॉपी कधी करू नये.

**पूर्व उपक्रम – महात्मा गांधींचे कार्य लिहा.**

**शब्दार्थ. १.यशदायी – यश देणारे. २.रीत – पद्धत**

**३.धास्ती – भय,भीती ४.दिनक्रम – दिवसाचे ठरलेले काम**

**कसोशीने – खूप प्रयत्नाने. ६. अचूक – बरोबर**

**वाकप्रचार.**

१.उत्तीर्ण होणे – पास होणे.

**प्रश्न १. पुढील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

१. या पाठात कोणाच्या जीवनातील घटना सांगितले आहे?
उत्तर – या पाठात महात्मा गांधीजींच्या जीवनातील घटना सांगितली आहे.

२. गांधीजींना कोणत्या विषयांची धास्ती वाटत होती?
उत्तर – गांधीजींना भूमिती व संस्कृत या विषयांची धास्ती वाटत होती.

३.गांधीजींचा शालेय दिनक्रम काय होता?
उत्तर – दररोज शाळेत जाणे व शाळा सुटताच सरळ घरी येणे हा गांधीजींचा शालेय दिनक्रम होता.

४. त्याकाळात लिहायची पद्धत काय होती?
उत्तर – त्या काळात खाली जमिनीवर बसून व पाटीवर लिहायची पद्धत होती.

५. गांधीजी 'महात्मा' का बनू शकले?
उत्तर – गांधीजींनी कॉपी कधीच केली नाही म्हणून ते 'महात्मा' बनू शकले.

**प्रश्न २. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. 'कॉपी' का करू नये?
उत्तर – मुलांनी कॉपी कधी करू नये कारण कॉपी करून मिळणारे गुण फसवे असतात.अभ्यास करून मिळणारे गुण यशदायी असतात.

२. इन्स्पेक्टर यांनी मुलांची कशी चाचणी घेतली?
उत्तर – इन्स्पेक्टर शाळा तपासणीसाठी आले व त्यांनी मुलांना पाच इंग्रजी शब्द सांगून त्यांच्या स्पेलीन्ग्ज लिहायला सांगितल्या.

३. वर्गाचा निकाल चांगला लागावा यासाठी वर्ग शिक्षकांनी काय केले?

३. वर्गाचा निकाल चांगला लागून छाप पडावी यासाठी शिक्षकांनी गांधीजींना हळूच बोटांनी टोकले व चुकलेला शब्द बाजूच्या विद्यार्थ्याच्या पाटीवर बघून बरोबर लिहीण्यास सुचवले.

४. चाचणी परीक्षेचा निकाल काय लागला?

४. गांधीजी सोडून इतर सर्व विद्यार्थ्यांनी पाचही शब्दांचे स्पेलिंग्ज अचूक लिहीले होते.

५. गांधीजींनी कोणत्या नियमाचे पालन केले?

५. चुकीच्या पध्दतीने कोणतीही परीक्षा उत्तीर्ण होणे त्यांना मान्य नव्हते. शालेय जीवनातील या नियमाचे त्यांनी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात कसोशीने पालन केले.

इ. समानार्थी शब्द लिहा.

१. धास्ती – भीती        २. दिनक्रम – दिवसाचे ठरलेले काम करणे

ई. विरुद्धार्थी शब्द.

| | | |
|---|---|---|
| १. मित्र × शत्रु | २. बरोबर × चूक | ३. लक्ष × दुर्लक्ष |
| ४. समज × गैरसमज | ५. उत्तीर्ण × अनुत्तीर्ण | ६. अचूक × चूक |
| ७. आवड × नावड | | |

उ. कंसातील शब्दयोंगी अव्यये वापरून ओळी पूर्ण करा.

१. एक ब्रिटीश इन्स्पेक्टर एकदा तपासणीसाठी आले होते.

२. गांधीजींच्या सुसंस्कारित मनावर त्यांचा काहीचा परिणाम झाला नाही.

३. त्या काळच्या रितीनुसार वयाच्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह झाला.

४. त्या काळात खाली जमिनीवर बसून व पाटीवर लिहायची पद्धत होती.

**S.Teacher**   **HOD**   **Co –Ordinator**   **Principal**